भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ०१/१८ माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०१/२०१८

## १) विवाहीतेच्या चारीत्र्यावर संशय घेवुन वैयक्तीक फौटो अपलोड करून बदनामी केल्याने गुन्हा नोंद

दिनांक ०६/०६/२०१७ चे आज पावेतो यातील आरोपी हा फिर्यादीचा पती असुन त्याचे ३ वर्षापुर्वी लग्न झाले होते. ते दोघेही विरली बु. येथे राहत होते, घरघुती क्षुल्लक कारणा वरून आरोपी हा फिर्यादीस वाईट–वाईट शब्दात शिवीगाळ करून तिचे चारीत्र्यावर संशय घेवुन त्रास देतो व फिर्यादीचे नावाचे फेसबुक अकाऊंट उघडुन त्यास फिर्यादीचे वैयक्तीक अश्लिल फोटो अपलोड करून तिचे नातेवाईकांना व मैत्रीनींना व्हाट्स्ॲप करून व फेसबुकवर एड्स असल्याचे मॅसेज व फोटो पाठवुन बदनामी करीत असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून व संगणक रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथील अप क्र. ००/१७ कलम ४९८,(अ),५००,३२३,५०९,५०६ भादवी.सहकलम ६६(क),६६(ई) माहीती तंत्रज्ञान कायदयाचे कागद पत्र टपालाने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे नंबरी गुन्हा दाखल करून पुढील तपास पोउपनी. बोरखडे हे करीत आहेत

## २) ट्रकच्या घडकेत एकाचा मृत्यु . :–

दिनांक ३०/१२/२०१७ चे २२.०० यातील आरोपी ट्रकचे क्र. एचआर ६६/९९९८ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, लापरवाहीने,निष्काळजीपणे चालवुन मृतकचे ऑयसर वाहन क्र. एमएच १० झेड ४९०४ ला धडक मारून चालक अर्जुनदास कुरियामाल मकोजा वय ५२ वर्ष रा. क्वेटा कॉलोनी नागपुर यास गंभिर दुखापत करून त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी आकर्षक अरूण बांते वय २५ वर्ष रा. भिलेवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनी. मेश्राम पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

## ३) नितीमत्तेला धोका पोहचविण्याचे दृष्टीने कृत्य करून जा.फौ. चे उल्लघंन करून प्रदर्शीत केल्याने गुन्हा नोंद. :–

दिनांक ३०/१२/२०१७ चे १८.०० ते ३१/१२/२०१७ चे ०६.१५ वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने लोकांच्या मनात भिती निर्माण करण्याचे उद्येशाने घटणास्थळी असलेल्या तुली सुटचे लोखंडी बोर्ड व अस्थेय रिसॉर्टचे लोखंडी बोर्डवर लाल कपडयाचे फलकावर भितीदायक शब्द लिहुन लोकांच्या मनात भिती निर्माण करण्याच्या व सभ्यता नितीमत्तेला धोका पोहचविण्याचे दृष्टीने कृत्य करून कलम ३७(१)(३) जा.फौ. चे उल्लघंन करून प्रदर्शीत केल्याने फिर्यादी उमराव अंताराम भलावी वय ४० वर्ष रा. पिटेझरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ५०६ भादवी. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

४) <u>जनावरांना वेदना होईल अशा स्थितीत दोराने बांधुन सोडुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद. :–</u>

दिनांक २६/१२/२०१७ चे १९.३४ वाजता दरम्यान यातील आरोपी हे जनावरांना यातना व वेदना होईल अशा स्थितीत त्यांना २–२ च्या जोडीने एकाच दोराला दोर बांधुन त्या जनावरांना गर्दीमुळे यातना वेदना होईल अशा स्थितीत सोडुन पळुन गेल्याने सरतर्फे पोउपनी. इंगळे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ११(१) प्रा.णी.वा. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. इंगळे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

५) <u>दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–</u>

दिनांक ३१/१२/२०१६ चे ०९.००ते ०९.३० वाजता दरम्यान यातील वाहन चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल होन्डा क्र. एम एच ४० झेड ४९२६ ही दारू पिवुन दारूच्या नसेत लायसन्स नसतांनी रोडवर चालवितांनी मिळुन आल्याने व वैदयकीय परीक्षण अहवालाव वरून आरोपी विरूध्द वरील कलमान्वये सरतर्फे फिर्यादी पो.ना. मनीष रामटेके वय यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १८५, ३, १८७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. मनीष रामटेके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

६) <u>दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–</u>

दिनांक ३१/१२/२०१६ चे १७.४५ वाजता दरम्यान यातील वाहन चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र.एमएच ४०झेड ४९२६ ही दारू पिवुन दारूच्या नशेत लायसन्स नसतांनी रोडवर चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ ॲनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. हटवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १८५, (१) मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सफौ.. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

७) <u>दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–</u>

**अ)** दिनांक ३१/१२/२०१६ चे १८.०० ते १८.३० वाजता दरम्यान यातील वाहन आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र.एमएच ३५ वाय ८८८७ ही दारू पिवुन दारूच्या नशेत रोडाने आडवी–तिडवी चालवितांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. फुकट यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोउपनी. फुकट पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ३१/१२/२०१६ चे १८.३५ ते १८.४५ वाजता दरम्यान यातील वाहन आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र.एमएच ३६ वाय ८२६५ ही दारू पिवुन दारूच्या नशेत रोडाने आडवी–तिडवी चालवितांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनी. फुकट यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोउपनी.फुकट पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**क)** दिनांक ३१/१२/२०१६ चे १९.०० ते १९.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र.एमएच ३६ पी ९५८१ ही दारू पिवुन दारूच्या नशेत रोडाने आडवी–तिडवी चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे दारू पिल्या बाबतचे वैद्यकीय परीक्षण अहवाला वरून सरतर्फे फिर्यादी पोउपनी. फुकट यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५ मो. वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोउपनी.फुकट पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

८) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवीतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–

**अ)** दिनांक ३१/१२/२०१६ चे २०.४५ वाजता दरम्यान यातील मोटार सायकल क.एमएच ५० ए २०४१ च्या चालकास नाकाबंदी दरम्यान थांबवुन त्याचे ब्रिथ अॅनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता, अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. इंगोले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १८५ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. इंगोले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ३१/१२/२०१६ चे २१.३० वाजता दरम्यान यातील आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ४० आर ४९४० च्या चालकास नाकाबंदी दरम्यान थांबवुन त्याचे ब्रिथ अॅनालायझर मशिन द्वारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पो.ना. इंगोले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १८५ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पो.ना. इंगोले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

९) गळफास लावुन इसमाचा मृत्यु :–

दिनांक ३१/१२/२०१७ चे ११.०० ते १३.२० वाजता दरम्यान यातील मृतक हरी चैतु पंचबुधे वय ७२ रा. खुर्सीपार यांनी त्याचे वर असलेल्या बॅकेच्या व सोसायटीच्या कर्जाला कंटाळुन तसेच यावेळी धानाचे पिक पीक गेल्याने, मृतकने तलावात असलेल्या पळसाच्या झाडाला गळफास लावुन आत्महत्या केल्याने, फिर्यादी प्रकाश नारद पंचबुधे वय ४५ रा. खुर्सीपार यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.नंदेश्वर पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

१०) मासे पकडण्यास गेले असता बोळीचे पाण्यात दोन इसमाचा मृत्यु :–

दिनांक ३०/१२/२०१७ चे ११.०० ते ३१/१२/१७ चे १४.३० वाजता दरम्यान यातील मृतक कमलेश रमेश चौधरी वय ३५ वर्ष २) ओमप्रकाश रामकृष्ण पाठक वय ४० वर्ष रा. चकारा हे मासे पकडण्यास चकारा शिवरातील बोळीत गेले असता, बोळीचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी रमेश बाबुराव चौधरी वय ६० वर्ष रा. चकारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गि–हेपुंजे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

११)विहीरीत पाय घसरून विहीरीत पडुन इसमाचा मृत्यु :–

दिनांक ३१/१२/२०१७ चे ८.४५ वाजता दरम्यान यातील मृतक आशिष भगवान भिवगडे वय ३१ वर्ष रा. गुजरी चौक लाखनी हा फिर्यादीचे घरी असलेल्या विहीरी मधील ईलेक्ट्रीक मोटार दुरूस्ती करीता आला होता व मोटार दुरूस्त करून विहीरी बाहेर लोखंडी कळयाचे सहायाने बाहेर येत असता, अचानक पाय घसरून विहीरीत पकडल्याने त्यास विहीरी बाहेर काढुन उपचारा करीता ग्रा.रू. लाखनी येथे नेले असता, डॉ. ने तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी हरीचंद्र बंडुजी ढवळे वय ६५ वर्ष रा. निर्वाण मोहल्ला सेलोटी रोड लाखनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. थेर पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.